वि.दि.दा..क्रं. २१/२०२१

लक्ष्मीबाई वि.शासन

**<u>नि.क्रं. १०४ खाली आदेश</u>**

प्रतिवादी ३ ने अर्ज देऊन नमूद केले की, दावा वाटप व स्वतंत्र कब्जाकरीता दाखल असून त्यातील कथने प्रतिवादीने नाकारली आहेत. प्रतिवादी ५ ने कैफीयत दिलीच नाही. गट क्रं.११० मधील ७५ आर व गट क्रं. ११० मधील ७१ आर प्रतिवादी ५ च्या नावे आहे. त्याबद्दल त्याने भाष्य केलेले नाही. सदर मिळकत दाव्यात समाविष्ट नाही असा बचाव प्रतिवादी ३ ने घेतला आहे. त्यामुळे त्या अनुषंगाने मुद्दे काढणे आवश्यक आहे. सबब, तीन प्रस्तावीत मुद्दे करुन अर्ज मंजूर करावा अशी विनंती करण्यात आली.

२. वादीने दिलेल्या म्हणण्यानुसार यापूर्वी काढलेले मुद्दे योग्य आहे. दाव्यास उशीर व्हावा म्हणून सदर अर्ज दिला आहे. त्यामुळे सदर अर्ज नामंजूर व्हावा.

३. याकामी उभय पक्षांचा युकतीवाद ऐकला.

४. प्रतिवादी ३ याने आपल्या कैफीयतीत परिच्छेद २ मध्ये गट क्रं. ११० व १११ वादी दाव्यात वगळले असल्याचे नमूद केले आहे. त्या अनुषंगाने मुद्दा निघणे आवश्यक आहे असे प्रतिवादी क्रं. ३ चे कथन आहे. दाव्यात नमूद मिळकती पाहता त्यामध्ये वर नमूद दोन मिळकती नाहीत. कैफीयतीमधील कथनावरुन वादीने दाव्यात दुरुस्ती केलेली नाही. त्यामुळे या दोन मिळकतींबद्दल वादीचे कथन पूर्वीप्रमाणेच आहे. प्रतिवादीनी या मिळकती एकत्र कुटुंबाच्या असल्याचे दर्शवून त्या अनुषंगाने कैफीयत दिली असली तरी ज्या मिळकती दावा मिळकती नाहीत त्या दाव्यात सामील करण्यासाठी वादीने तजवीज केली नसल्याने अर्जातील प्रस्तावीत मुद्दा क्रं. १ काढण्याची आवश्यकता नाही. प्रस्तावीत मुद्दा क्रं. २व ३ हे कायदेशीर मुद्दे आहेत ते तथ्याचे मुद्दे नाहीत. त्यामुळे त्यांचीही आवश्यकता नाही. या कारणास्तव अर्ज नामंजूर करण्यात येतो.

स्वाक्षरीत/-

**दिनांक १४/०२/२०२६.**

**[एस.एन.सरडे]**

दिवाणी न्यायाधीश व. स्तर, अहमदपूर.